**नियमीत दिवाणी दावा क्र. ७१/२०११**

**पुंडलिक कृष्णा**

**विरुध्द.**

**भानुदास लहुजी**

**अर्ज निशाणी १३५ खालील पारित आदेश**

**(पारित दिनांक २२/०७/२०२५)**

१. प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे कोर्ट कमिशनरची नेमणुक करण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादीचे कथन आहे की, दावा मिळकतींच्या वादी व प्रतिवादीने दावा दाखल करण्यापूर्वी मोजणी केलेली आहे. वादीने सि.स.नं.१४३ ची मोजणी दि.२६/०७/२०११ रोजी केली असुन प्रतिवादीने दि.१९/०३/२०११ रोजी सि.स.नं.१४४ ची मोजणी केलेली आहे. त्यानंतर वादीने दावा दाखल केला व प्रतिवादीने त्यास खुलासा व काउंटर क्लेम दाखल केला आहे. प्रतिवादीचे पुढील कथन असे आहे की, वादीचा दावा डिसमिस झालेला आहे व प्रतिवादींचा प्रतिदाव्याचे चौकशीचे कामकाज सुरु आहे. त्यामध्ये प्रतिवादीने स्वतःची साक्ष व मोजणी करणारे अधिकारी यांची साक्ष नोंदवली आहे. वादीतर्फे घेण्यात आलेल्या प्रतिवादींच्या साक्षीदारांच्या उलटतपासात सदर मोजणी नाकारली असुन मोजणी चुकीची असल्याचे उलटतपासात सुचवले आहे. त्यामुळे सदर दोनही मिळकतींची मोजणी एकत्रीत होणे आवश्यक आहे. त्यासाठी सिटी सर्व्हे अधिकारी यांची कोर्ट कमीशनर म्हणुन नेमणुक करुन त्यांचे रेकॉर्ड प्रमाणे वादमिळकतींच्या मोजणीशिट व स्वतंत्र अहवाल मागवणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रतिवादींनी सदरचा अर्ज दाखल करुन वादमिळकतीची मोजणी करण्यासाठी भुमि अभिलेख अधिकारी भडगाव यांची कोर्ट कमिशनर म्हणुन नेमणुक करुन त्याचे रेकॉर्ड प्रमाणे मौजे गुढे येथील सि.स.नं.१४४ व १४३ अशा

मिळकतींच्या मोजणी शिट व स्वतंत्र अहवाल मागविण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादीतर्फे निशाणी १३७ वर खुलासा दाखल करुन कथन केले आहे की, वादीने भिंत बांधण्यास प्रतिवादीने हरकत अडथळा करु नये असा निरंतर मनाई हुकुमाचा दावा केला आहे. प्रतिवादीने प्रतिहक्क कलम २३ मध्ये दि.१९/०३/२०११ व २६/०४/२०११ च्या मोजणीप्रमाणे जागेचा कब्जा मिळावा असा प्रतिहक्क दावा दाखल केला आहे. मोजणी नकाशा सुट दस्त आहे. मोजणी करुन प्रतिहक्क मागीतलेला आहे. मोजणीबाबत साक्षीदार तपासले आहेत. दाव्याचा निकाल झालेला नाही, तसेच मोजणी खोटी व चुकीची झाली आहे असा निष्कर्ष न्यायालयाने काढालेला नाही. त्यामुळे मोजणीबाबत अशाप्रकारचा अर्ज देता येत नाही. प्रतिवादीने घर पाडुन टाकले आहे, घर शिल्लक राहीलेले नाही, कैफियत प्रमाणे आज घराची स्थिती नाही. त्यामुळे प्रतिवादीचा प्रस्तुतचा अर्ज रद्द करण्याची मागणी वादीने केली आहे.

४. दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

५. वादींनी प्रस्तुतचा दावा हा निरंतर मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. वादींच्या मते घर मिळकतीच्या दक्षीणेकडील ४ फुट भिंतीच्या विटांच्या पुढील बांधकामास प्रतिवादी हरकत व अडथळा करत आहे. त्यामुळे वादींना सदरचा दावा दाखल करणे भाग पडले आहे. दि.०३/१२/२०२४ रोजी प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास नोंदविण्यात आला व त्यानंतर दि.१७/१२/२०२४ रोजी प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादीच्या मते दि.१९/०३/२०११ व दि.२६/०७/२०११ च्या सिटी सर्व्हे च्या मोजणीप्रमाणे प्रतिवादीच्या घराची रुंदी वादीच्या घराच्या दारापर्यंत आहे व नंतर वादीचे घर सुरु होऊन त्यामुळे सदर दाव्यात प्रतिवादीने अतिक्रमण काढुन कब्जा मिळण्यासाठी काऊंटर क्लेम दाखल केला आहे.

६. प्रस्तुतचा दावा पाहता सदर प्रकरणात कोर्ट कमिशनर नियुक्त केल्यास सत्य परिस्थिती न्यायालयासमोर येण्यास मदत होईल. प्रकरणाचा गुंता कमी होईल.

शिवाय सदरचा अर्ज मंजुर केल्यास वादीचे व प्रतिवादीचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. वाद संपूर्णपणे गुणवत्तेवर निकाली लावण्यासाठी कोर्ट कमिशनरची नियुक्ती करणे न्यायोचित असल्याचे दिसुन येते. सबब, खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. तालुका भुमि अभिलेख अधिकारी, भडगाव यांची कोर्ट कमिशनर म्हणुन नियुक्ती करण्यात येते.

३. कोर्ट कमिशनर यांनी मौजे गुढे येथील सि.स.नं.१४४ व १४३ यांची मोजणी करुन अहवाल दोन महिन्याच्या आत सादर करावा.

४. कोर्ट कमिशनर यांनी दोन्ही पंक्षकारांना व त्यांच्या विधीज्ञांना मोजणीची तारीख व वेळ याविषयी पुर्व नोटीस दयावी.

५. प्रतिवादीने कोर्ट कमिशनरची फी संबंधीत कार्यालयात जमा करावी.

६. कोर्ट कमिशनर विषयीचे पत्र संबंधीत कार्यालयास देण्यात यावे.

स्वा/–

**दि.२२/०७/२०२५** **( श्रीमती.प्रा. वि. राजळे )**

**न्यायदंडाधीकारी वर्ग – १, भडगाव.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file judgment are same word for word as per original judgment.

| | |
|---|---|
| Name of Court | :- Smt. P.V. Rajale, C.J.J.D. & JMFC, Bhadgaon |
| Name of Steno | :- M.P. Wani, Stenographer Gr.III |
| Date of Decision Judgment | :- 22/07/2025 |
| Signed by Presiding Officer On | :- 22/07/2025 |
| Judgment upload on | :- 23/07/2025 |